## नियमित दिवाणी दावा क्र.१८५/२०२० मधील अर्ज नि.क्र.१८ वरील आदेश

**CNRMHSN06002063-2020**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत रेकॉर्डवर घेण्याबाबत परवानगी मिळणेची विनंती केली आहे. अर्ज वाचला. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रस्तुत प्रतिवादी यांना कोरोना रोगाच्या साथीमुळे वकीलांना भेटून ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करता आली नाही .त्या कारणास्तव सदरकामी कैफियत देणेस झालेला विलंब माफ होवुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेण्याबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेणेस हरकत नसल्याचे म्हटले आहे.

४. अर्जामधील कथने प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रतिवादींना दाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा कोरोना प्रादुर्भावामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे झाला असल्याचे दिसुन येते . प्रतिवादींनी शपथेवर केलेले सदर कथन संयुक्तीक वाटते. दावा हा वाटपासाठी, कायम ताकिदीसाठी व हक्कज्ञापनेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर आलेस वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादींना एक संधी देणे आवश्यक वाटते . सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजुर करण्यात येतो.

**सही/-**

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे-गरड )**

दि. २७/११/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 27.11.2021. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 27.11.2021. |
| Order uploaded on. | : | 27.11.2021. |